# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/२२१६३९६५, फॅक्सः २२१६३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in
वेब-साईटः www.mercindia.org.in / www.merc.gov.in


## जाहीर सूचना

## सन २०१८ चे प्रकरण क्र.२०४

जाहिरात क्र. : --- / २०१७-१८

**आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाकरिता सामान्य (जेनेरिक) वीज दराच्या प्रारुप आदेशावर अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागविण्याबाबत**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सन २०१८ च्या प्रकरण क्र. ११३ मध्ये दि. २४ एप्रिल, २०१८ रोजी दिलेल्या आदेशान्वये, नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानासाठीच्या सन २०१७ च्या प्रकरण क्र. ३३ मध्ये दि. २८ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या विद्यमान सामान्य (जेनेरिक) वीज दर आदेशाची प्रयोज्यता, त्याच्या संबंधित अटी आणि शर्तींसह, दि. ३१ जुलै, २०१८ किंवा नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाकरिता आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी नवीन सामान्य वीज दर आदेश निर्गमित होईपर्यंत, यापैकी जे आधी होईल त्या दिनांकापर्यंत वाढवली आहे.

२. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी आणि शर्ती) विनियम, २०१५ च्या विनियम ९ च्या अनुरोधाने, आर्थिक वर्ष २०१८-१९ करिता (सन २०१८ चे प्रकरण क्र. २०४) महाराष्ट्रातील नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाकरिता सामान्य (जेनेरिक) वीज दराच्या निश्चितीकरणाबाबत आयोगाने स्वतः प्रारुप आदेश तयार केला असून, सदर प्रारुप आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

३. या प्रारुप आदेशावर, आयोग लेखी अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागवित असून, त्या ६ (१+५) प्रतींमध्ये, आयोगाचे सचिव यांना, मविनिआ, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५, येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने, किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्सः०२२-२२१६३९७६, ई-मेलः mercindia@merc.gov.in) द्वारा **दि. ३१ जुलै, २०१८** पर्यंत कृपया पाठविण्यात याव्यात.

४. या अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकतींवर पाठविणा-याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता, असल्यास, देण्यात यावा. जर कोणत्याही संस्था किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने हरकती पाठविण्यात येत असतील तर तसे नमूद करण्यात यावे. पाठविणा-या व्यक्तीला आपले म्हणणे व्यक्तीशः मांडावयाचे असेल तर तसे देखील त्यामध्ये नमूद करावे, म्हणजे अशा प्रकरणी सदर व्यक्तीला, **१३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५ येथील आयोगाच्या कार्यालयात मंगळवार, दिनांक ३१ जुलै, २०१८ रोजी, सकाळी १०.०० वाजता** होणा-या जाहीर सुनावणीमध्ये, त्याचे म्हणणे मांडण्याची संधी आयोगाकडून देण्यात येईल, त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

५. **दिनांक ३१ जुलै, २०१८** रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त होणारे सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती आयोगाकडून प्रारुप आदेशास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी विचारात घेण्यात येतील.

दिनांक : ०९ जुलै, २०१८

ठिकाण : मुंबई

सचिव, मविनिआ